

High Priority	Medium Priority	Low Priority
7. Establishment and Implementation of Environmental Management System (EMS ISO 14001) by SMKMC 8. Insitu Biological treatment in Nallahs in SMKMC (Sheri Nallah, Haripur Nallah & Malgaon Odha) 9. Replacement of Conventional Traffic Signal Lights with LED Lamps 10. Assessment of CDM Possibilities in Waste Sector		

६. संस्थांगत रचना व आर्थिक तरतूद

६.१ प्रस्तावित संस्थांगत रचना

सद्यस्थितीत प्रकल्प मांडणी, व्यवस्थापन, प्राधान्यक्रम ठरवणे, आर्थिक पुरवठ्यासाठी अर्ज तयार करणे वित्तव्यवस्थापन अंमलबजावणीचे निरिक्षण करणे इ. कामांकरता लागणारे कौशल्य सांमिकू मपाकडे नाही. शिवाय महापालिकेची रचना खूपच खातेमय असून इकोसिटी करता आवश्यक अशी एकात्मिक दृष्टी व रचना म.पा.कडे नाही. यामुळे इकोसिटीच्या प्रभावी अंमलबजावणी करता स्वतंत्र संस्था प्रस्तावित केली आहे.

६.२ विशेषहेतू संस्थेची स्थापना

इको-सिटी प्रकल्पाच्या अंमलबजावणी करता सांगली-मिरज-कुपवाड इको-सिटी प्राईवेट लिमिटेड (एस ई पी एल) कंपनी स्थापित व्हावी. एस ई पी एल एक खासगी कंपनी असेल जिचे सर्व मालकी हक्क सांमिकू मपाकडे असतील.

६.२.१ एस ई पी एल ची रचना

इको-सिटी अंतर्गत प्रकल्प राबवण्याकरता एक स्वतंत्र सेल स्थापला जावा ज्याचे नेतृत्व "प्रमुख कार्यकारी अधिकारी" करेल. एस ई पी एल ची चार खाती असतील.

(१) प्रकल्प धोरण व नियोजन खाते - धोरण ठरवणे , तांत्रिक संशोधनांचे नियोजन
(२) प्रकल्प अंमलबजावणी खाते - प्रकल्पांचे व्यवस्थापन व अंमल बजावणी

पर्यावरण व्यवस्थापन केंद्र (ई.एम.सी.) Page 22